माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य, माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : ०१/२०२३**

**तक्रारकर्ता, श्री. ज्ञानेंद्र शैलेन्द्रनाथ बिश्वास,**

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी, तथा ग्रामसेवक,**
**ग्रामपंचायत, गोविंदपूर, ता. मुलचेरा,जि. गडचिरोली**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),**
**पंचायत समिती, मुलचेरा, ता. मुलचेरा,जि. गडचिरोली**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २९.०३.२०२३**

| | | |
|---|---|---|
| **तक्रारकर्ता** | : | उपस्थित |
| **जन माहिती अधिकारी** | : | उपस्थित |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | उपस्थित |

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| २८.०६.२०२२ | --- | ०२.०१.२०२३ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र. २३७७/२०२०, दिनांक २८.०६.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक २९.०३.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, गोविंदपूर, ता. मुलचेरा,जि. गडचिरोली श्री. अक्षय पी. कुळमेथे उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती, मुलचेरा, ता. मुलचेरा,जि. गडचिरोली श्री. एम. एल. रामटेके उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील क्र. २३७७/२०२० मध्ये दिनांक २८.०६.२०२२ रोजी सुनावणी घेवून " ग्रामपंचायत गोविंदपूर अतंर्गत दिनाक ०१ जाने २०१० ते ३१ मार्च २०२० या कालावधीची माहिती मागितलेली असून सदर

माहिती ही विस्तृत स्वरुपाची आहे. त्यामुळे सदर माहितीचे विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी संकलन करून अपिलार्थी यांना कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत पूर्व सुचना देऊन माहितीच्या अवलोकनाची संधी प्रदान करावी व त्यानुसार अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेल्या माहितीच्या एकूण १०० पृष्ठांची माहिती अपिलार्थीस विनामूल्य प्रदान करावी . " या आदेशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात आले आहे.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक ०२.०१.२०२३ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपिलार्थी यांनी अपिल क्र. २३७७/२०२० मध्ये दि. २८.०६.२०२२ रोजी आयोगाने पारित केलेल्या आदेशानुसार सचिव ग्रामपंचायत मुलचेरा, गडचिरोली यांच्यावतीने दि. २१.११.२०२२२ रोजी अपिलार्थी यांना दि. २८.११.२०२२ रोजी अवलोकनार्थ पाचारण करण्यात आले होते. त्यानंतर दि. ०६.१२.२०२२२ रोजी ग्रापंचायत कार्यालयीन वेळेत येवून चिन्हांकित माहिती घेवून जाण्यासाठी सांगितले. अपिलार्थी यांच्या म्हणण्यानुसार दि. २३.१२.२०२२ रोजी १०.०० वाजता गोंविदपूर येथे हजर झाले असता सरपंचाव्दारे त्यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न व त्यांना धमकी देण्यात आली. त्याआधी अपिलार्थी दि. १९.१२.२०२२ रोजी पोलीस स्टेशन, मुरचेरा येथे ग्रामपंचायत कार्यालयात माहिती प्राप्त करून घेण्यास जाणार आहे. संरपंचाचा हल्ला होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कलम ५०४, ५०७ नुसार प्राणघातक गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे नमूद केले आहे.

ही बाब लक्षात घेता, पोलीस स्टेशन मुलचेरा यांनी अपिलार्थी यांना माहिती प्राप्त करून घेण्याच्या दृष्टीने संरक्षण द्यावे. जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत मुलचेरा, गडचिरोली यांच्याशी समन्वय साधुन निश्चित वेळ देवुन त्यांना कुठल्याही दमदाटी शिवाय त्यांना मोकळ्या वातावरणात सुरक्षा यंत्रणेच्या देखरेखीखाली मदत करावी. याआधी आदेशित केलेल्याप्रमाणे अपिलार्थी यांना संपूर्ण १०० पृष्ठांची माहिती सदर आदेश प्राप्त होताच २ आठवड्याच्या आत विनामूल्य प्रदान करावी व १०० पृष्ठांव्यतिरिक्त उर्वरीत माहिती सशुल्क प्रदान करावी, या आदेशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(राहुल भा. पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते

**ठिकाण- नागपूर**
**दिनांक -२९.०३.२०२३**

**जा.क्र.**-3588--**दि.**------------ 8 JUN 2023